# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
# क प्रभाग समिती
# कार्यपत्रिका क्रमांक-१४
# सभावृत्तांत

दि.- ०२/३/२०१६ वेळ –दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ०२/३/२०१६ रोजी दुपारी ३:०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा. मोटे किरण बाळासाहेब** **सभापती**
२) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
३) मा.भोसले राहूल हनुमंतराव
४) मा.सौ.पानसरे अमिना महंमद
५) मा.शितोळे शैलजा बाबुराव
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
८) मा.प्रशांत शितोळे
९) मा.संजय केशवराव काटे
१०) मा.सतिश सदाशिव काटे स्वीकृत सदस्य
११) मा.गणेश आनंदराव ढोरे ------“--------
१२) मा.हमीद नवाब शेख ------“--------

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.जयंत बरशेट्टी-कार्यकारी अभियंता पापु, मा.प्रदीप पुजारी - कार्यकारी अभियंता झोनिपु, मा.विशाल कांबळे- उपअभियंता स्थापत्य, मा.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, मा.वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.जावळे -उपअभियंता (पापु), मा.बोत्रे- उपअभियंता स्थापत्य, श्री.क्षिरसागर-कनिष्ठ अभियंता स्थापत्य, मा.उगले-लेखाधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- १) प्रभाग क्र.६३ कासारवाडी मधील आ.क्र.२२ येथील खेळाच्या मैदानास कै.आण्णासाहेब नानासाहेब मोटे नांव देणेबाबत- मा.किरण मोटे,मा.अतुल शितोळे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- २) प्रभाग क्र.६४ मधील दापोडी-बोपखेल मधील गल्ल्यांना व चौकांचे नामकरण करणेबाबत- मा.अतुल शितोळे,मा.संजय काटे,मा.सतिश काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) मौजे सांगवी येथील स.नं.८३ व ८४ पैकी मोकळया जागेत सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षणे प्रस्तावित करणेबाबत- मा.प्रशांत शितोळे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) सांगवी गावठाण प्र.क्र.६० मधील नामफलकाबाबत- मा.प्रशांत शितोळे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) सांगवी गावठाण प्र.क्र.६० मधील गाळा भाडयाने देणेबाबत- मा.प्रशांत शितोळे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक-६) दापोडी बॉम्बे कॉलनी येथील जुना १६ सिटर्सचा संडास ब्लॉक पाडणेबाबत- मा.रोहितआप्पा काटे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा.अतुल शितोळे अनुमोदक-मा.संजय काटे

पिंपरी चिंचवड मनपाच्या क प्रभाग समिती सभेचे मा.सभापती श्री.किरण मोटे यांचे वडील व नामवंत सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब नानासाहेब मोटे यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

**मा.सभापती-** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

अ) दि.६/१/२०१६,३/२/२०१६,व दि.११/२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दि. ३/२/२०१६ व दि.११/२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दि.११/२/२०१६ रोजी झालेल्या विशेष सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १६२ विषय क्रमांक- १

दिनांक २/३/२०१६ विभाग-

सुचक-मा. अतुल शितोळे अनुमोदक -मा. संजय काटे

संदर्भ- मा.किरण मोटे,मा.अतुल शितोळे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६३ कासारवाडी मधील आ.क्र.२२ येथील खेळाच्या मैदानास **"कै.बाळासाहेब नानासाहेब मोटे"** अशी कमान उभारुन् त्वरीत नांव देणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - १६३ विषय क्रमांक- २

दिनांक २/३/२०१६ विभाग-

सुचक-मा. अतुल शितोळे अनुमोदक -मा. संजय काटे

संदर्भ- मा.अतुल शितोळे,मा.संजय काटे,मा.सतिश काटे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६४ मधील दापोडी-बोपखेल येथील गल्ल्यांना व चौकांचे १) शिवशक्ती चौक २) अल्बन चौक् ३) शंकर काची चाळ ४) कमल गायकवाड चाळ ५) तक्षीलानगर ६) बापु काटे चाळ ७) गुलाबनगर चाळ ८) न्यू गुलाबनगर चाळ ९) बापु काटे चाळ १०) आदर्शनगर चाळ ११) गुरव पट्टा चाळ १२) काळुराम काटे चाळ १३) पवार वस्ती १४) पवार वस्ती १५) नवभारत नगर १६) पवार वस्ती १७) नालंदा बुध्द विहार १८) जाधव चाळ १९) बहिरट चाळ २०) एम.एस.काटे चाळ २१)कर्मवीर संभाजी चौक २२) तुपे चाळ २३) सुदाम काटे चाळ २४) रौंदाळे चाळ २५) बबन काटे चाळ २६) धोका चाळ २७) बाजीराव काटे चाळ २८) भोंडवे वाडा २९) शिवनेरी १ ३०) शिवनेरी २ ३१) शिवनेरी ३ ३२) शिवनेरी ४ याप्रमाणे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.क प्रभाग समिती ठराव क्रमांक ९२ दि.४/९/२०१३ मध्ये "प्रभाग क्र.६४ बोपखेल गावाकडे जाणा-या रस्त्यावरील चौकास "**गणपतराव घुले पाटील चौक**" याऐवजी "**नारायण घुले पाटील चौक**" व त्यालगतच्या रस्त्यांस, त्या सर्वेमधील रस्त्यांस "**रामचंद्र घुले पाटील पथ**" याप्रमाणे दुरुस्त्या करुन नामफलक बसविण्याची कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - १६४ विषय क्रमांक- ३
दिनांक २/३/२०१६ विभाग-
सुचक-मा. प्रशांत शितोळे अनुमोदक -मा. किरण मोटे
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहराचे जुन्या हद्दीची सुधारित विकास योजना शासनाने दि१८/९/१९९५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजुर केली.सदर विकास योजनेत मौजे सांगवी येथील स.नं.८३ पैकी व ८४ पैकी मधील क्षेत्र काही भाग अस्तित्वातील रस्त्यातील असून उर्वरित क्षेत्र निवासी विभागात समाविष्ठ आहे.तसेच सदर क्षेत्राचा काही भाग नदीच्या निळया व लाल पूर रेषेने बाधीत आहे.सदर जागा मुंबई-पुणे रस्त्यांपासून साधारणपणे १-२ कि.मी.अंतरावर आहे.सदर निवासी विभागातील जागा सदयस्थितीत अविकसित मोकळी आहे.सदर जागा पुणे व पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे याठिकाणी सिटी लेव्हलची काही सुविधा नागरिकांना विकसित करणे संयुक्तिक ठरेल व नागरिकांना सोईची होणार आहे.

सांगवी येथील सदरचे क्षेत्र हे १८.०० मीटर रुंदीचे रस्त्याच्या लगत आहे.सदर जागा महापालिका उपयोगासाठी व खुले क्रीडा संकुल **( Open Sports Complex)** योजनासाठी आरक्षित केल्यास शहरातील सर्व नागरिकांना मध्यवर्ती अशी सिटी लेव्हलची सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होईल. तसेच शहरातील हजारो नागरिकांनी याठिकाणी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे.

सदर जागेवरील उत्तर-दक्षिण असणा-या १८ मी.रुंदीचे रस्त्यालगत शासनाच्या पाटबंधारे विभागाचे इमारतीचे उत्तर दिशेस इमारतीलगत पासून पाटबंधारे वसाहतीचे पंप हाऊसची जागा व इतरत्र मोकळया जागेत स्थलांतरीत करुन घेणेसह व त्याठिकाणी होणा-या मोकळया जागेसह या जागेलगत पुर्व-पश्चिम असा रस्ता व असणा-या नाल्यालगतची अंदाजे १८ एकर मोकळया जागेत नागरिकांना अत्यंत उपयुक्त होईल अशा स्वरुपाची आरक्षणे असणे व विकसित करणे अशी मागणी आहे.

म्हणुन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सुधारित मंजुर विकास योजनेतील मौजे सांगवी येथील स.नं.८३ पैकी व ८४ पैकी सुमारे १८ एकर मोकळया जागेत सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षणे प्रस्तावित करण्यास महापालिका उपयोगासाठी व खुले क्रीडा संकुल **( Open Sports Complex)** या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाची कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्याकामी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेकामी मामहापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे मान्यतेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - १६५ विषय क्रमांक- ४
दिनांक २/३/२०१६ विभाग-
सुचक-मा. प्रशांत शितोळे अनुमोदक -मा. किरण मोटे
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपाने विकसीत केलेल्या कोणत्याही स्वरुपाच्या कामांकरिता सदर कामाबाबतचे नावाचे कायमस्वरुपी नामफलक लावणेकरिता तथा या नामफलकावर संबधित नगरसदस्यांचे नांव लावणेकरिता मान्यता व्हावी व याकरिता सांगवी गावठाण प्र.क्र.६० मधील कामांबाबत उल्लेखीत केलेप्रमाणे नामफलक लावणेकरिता या प्रस्तावाद्वारे कायम होणेची वाट न पहाता मंजुरी व्हावी तसेच या परिसरातील प्रचलित नगरांप्रमाणे विविध गल्ली-बोळे,रस्ते,नागरिकांची नावे याप्रमाणे नामफलक, प्रबोधनफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - १६६ विषय क्रमांक- ५
दिनांक २/३/२०१६ विभाग-
सुचक-मा. प्रशांत शितोळे अनुमोदक -मा. किरण मोटे
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

मनपाच्या सांगवी गावठाण प्रभाग क्र.६० मधील मौजे सांगवी सर्वे क्र.६ मध्ये मनपाने विकसित केलेल्या “शिवसृष्टी उदयानातील” अनेक दिवसांपासून रिकाम्या असलेले गाळयांपैकी गाळा क्र. १ हा चाणक्य या सामाजिक संस्थेस महिलांचे खादयपदार्थ तथा इतर प्रकारचे उपक्रमांकरिता ११ महिनेच्या कालावधीकरिता भाडे कराराने देणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - १६७ विषय क्रमांक- ६
दिनांक २/३/२०१६ विभाग-
सुचक-मा. प्रशांत शितोळे अनुमोदक -मा. किरण मोटे
संदर्भ- मा.रोहितआप्पा काटे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव

दापोडी येथील बॉम्बे कॉलनी मधील पुणे मनपा मधील ४० वर्षापुर्वीचा संडास ब्लॉक आहे.सध्याचा संडास ब्लॉक जुना व नादुरुस्त झाला आहे. स्लॅब लिकेज आहे.भिंती खराब झाल्या आहेत त्यामुळे जुना संडास ब्लॉक पाडण्यात यावा. पर्यायी व्यवस्था म्हणुन सोयीसाठी नवीन १२ संडास ब्लॉक बांधण्यात आला आहे. तरी दापोडी येथील जुना संडास ब्लॉक विकसित करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(मोटे किरण बाळासाहेब )
सभापती क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा) क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र.कक्षेका/कावि/सभा/ ४३ /२०१६
दिनांक - ४/३/२०१६
प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.